Vol II Issue VIII Feb 2013

Impact Factor : 0.1870

ISSN No :2231-5063

# Monthly Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 8, Feb. 2013
**ISSN:-2231-5063**
Available online at www.aygrt.net

**ORIGINAL ARTICLE**

# *शूक्रनीती आणि शिवाजीराजांची युद्धपद्धती – कूटयुद्ध एक दृष्टीक्षेप*

*विजय वाय. जाधव*

सहयोगी प्राध्यापक,संरक्षण शास्त्र
गजमल तुळशीराम पाटील महाविद्यालय,नंदुरवार

***सारांश:***

भारतीय युद्धपद्धतीचा मागोवा घेतल्यास असे दिसते की, वैदिक काळातील ऋग्वेद, मनुस्मृती व शुक्रनीतीसार या ग्रंथांमध्ये युद्धाचे धर्मयुद्ध व कूटयुद्ध असे दोन प्रकार सांगितले आहेत. त्यानुसार रामायणातील आणि महाभारतातील काही घटना कूटयुद्धाकडे अधिक झुकणा–या दिसतात. रामायण महाभारत काळातील राजनीतीमध्ये कूटयुद्धाचा उपयोग केला जात असल्याचे दिसते. कारण युद्ध जिंकण्यासाठी साम, दाम, दंड, भेद या नीतीचा उपयोग केला जात होता. प्राचीन काळात भारतीय राजांनी सुरुवातीला धर्मयुद्ध केले. ते धर्मयुद्धाचे अनुयायी असल्याची समजूत आहे. आठव्या शतकापासून भारतावर मुसलमानांची आक्रमणे होण्यास सुरुवात झाली. त्यांचा विचार करता भारतीय राजांनी स्वीकारलेल्या धर्मयुद्धाचे परिणाम भोगावे लागल्याचे दिसते. सिंध प्रांतावर आक्रमण करणारा महंमद कासीम व त्यानंतरचे गझनीचा महंमद व महंमद घोरी यांचे हेतू भारतातील संपत्तीची लूट करणे, हिंदूंच्या बायकांची लूट करणे व धर्मप्रसार करणे हे होते. मुसलमानांच्या या युद्धपद्धतीमुळे धर्मयुद्धाने लढणा–या भारतीय राजांचा टिकाव लागेनासा झाला आणि शेवटी मुसलमानांची राजकीय सत्ता भारतात प्रस्थापित झाली. दिल्लीचा शेवटचा समजला जाणारा हिंदू राजा पृथ्वीराज चव्हाण धर्मयुद्धाचा अनुयायी होता. त्याने धर्मयुद्धाला अनुसरून तराईच्या लढाईत युद्धाचरण केले. पृथ्वीराज चव्हाणने महंमद घोरी याचा तराईच्या पहिल्या लढाईत पराभव केला, परंतु त्याचा नाश न करता धर्मयुद्धात अनुस्यूत असलेल्या तत्त्वांना अनुसरून शरण आलेल्यास अभय द्यावे येणेप्रमाणे आचरण करून घोरीला सोडून दिले. त्यानंतर पूर्ण तयारी करून महंमद घोरीने पृथ्वीराज चव्हाणावर आक्रमण करून त्याचा पराभव केला. त्याला कैद करून ठार केले आणि राजपूतांचे राज्य काबिज करून दिल्लीचा सुलतान बनला. अशा रीतीने मुसलमानांनी उत्तर हिंदुस्थानात सत्ता निर्माण करून तिचा विस्तार संपूर्ण हिंदुस्थानभर केला. दक्षिणेतील कित्येक मराठी सरदार मुसमनांच्या दरबारी होते. त्यांना मुसलमानांची कूटनीती पूर्ण परिचित झाली होती. त्यामुळे शिवपूर्व काळातच प्राचीन भारतीय राजनीतीमध्ये धर्मयुद्धपद्धती जाऊन फक्त कूटनीती शिल्लक राहिली व ती सर्वमान्य बनली होती. शिवाजीराजांनी स्वराज्य स्थापनेचे ध्येय आपल्यापुढे ठेवून खडे सैन्य उभारण्यावर भर दिला आणि कूटयुद्धपद्धतीचा अवलंब केला.

***प्रस्तावना :***

शिवाजीराजांनी कूटनीतीचा स्वीकार करण्याच्या अनेक कारणांपैकी महत्त्वाचे कारण म्हणजे स्वराज्य स्थापनेच्यावेळी आदिलशाहच्या मुलखातून स्वराज्यासाठी मुलूख मिळवण्याची सुरुवात केली होती. त्यामुळे मोठी सेनासंख्या आणि विपूल युद्धसामग्री असलेल्या, शक्तिशाली प्रतिस्पर्ध्याशी अल्प सैन्य व अल्प सामर्थ्यानिशी संघर्ष करून आपले ध्येय साधावयाचे होते. आदिलशाही व मोगलांच्या सामर्थ्यापुढे टिकाव लागणे शक्य नसल्यामुळे कूटयुद्धाचा स्वीकार केला.

याशिवाय मुसलमानी सैन्यात मिजास व अवजडपणा कमालीचा वाढला होता. भारतावर आक्रमणे झाली त्यावेळेची त्यांची धडाडी, काटकपणा व शौर्य कमी होऊन त्यांच्यात सुखलोलूपता वाढली होती.[१] त्यासाठी चपळतेने कार्यवाही करणा–या युद्धपद्धतीचा स्वीकार शिवाजीराजांनी केला.

कूटयुद्धाकरीता शिवाजीराजांनी शुक्रनितीमध्ये सांगितल्याप्रमाणे गतिमान घोडदलास महत्त्व देऊन त्याची उत्तम प्रकारे उभारणी केली.

क्षण युद्धाय सज्जेत क्षणं चापसरेत पुनः ।
अकस्मान्नियतेहूरादृस्युवत परितस्सदा ।।३७४।।

युद्ध एकाएकी सुरू करावे, शत्रूवर एकदम हल्ला करावा व तात्काळ अदृश्य व्हावे.[२] याप्रमाणे युद्ध करण्यास शिवाजीराजांना त्यांच्या घोडदळाचा उपयोग झाला आणि त्याच्याच जोरावर शिवाजीराजांना अजिंक्यत्व लाभले.

शूक्रनीतीमधील अनेक वचनांतील धोरण शिवाजीराजांनी आपल्या व्यवहारात आणलेले दिसते. स्वराज्याचे कार्य सुरू केले त्यावेळी उपलब्ध असलेले सेनासामर्थ्य आणि शत्रूचे सेनासामर्थ्य याचा विचार करून आपल्या सेना सामर्थ्याचा परिणामकारक उपयोग व कमीत कमी

**Title :** *शूक्रनीती आणि शिवाजीराजांची युद्धपद्धती – कूटयुद्ध एक दृष्टीक्षेप*
**Source:Golden Research Thoughts [2231-5063]** *विजय वाय. जाधव* **yr:2013 vol:2 iss:8**

हानी याची खबरदारी शिवाजीराजांनी घेतलेली होती. त्याचप्रमाणे बलाढय शत्रूशी लढा दिला होता. याची काही उदाहरणे प्रसंग स्वरूपात पुढीलप्रमाणे

१) अफजलखानाने शिवाजीराजांवर आक्रमण केले तेव्हा त्याच्याकडे मोठे सैन्य होते. त्या प्रसंगाला सामोरे जाण्यासाठी कोणते धोरण असावे यावर आपल्या सरदारांशी विचारविनिमय करताना शिवाजीराजांनी असे मत मांडले होते की, ''याशी कोणत्या प्रकारे लढाई करावी, विचार कसा करावा, कासेबीत कसे आणावे, मोंगली फौज प्रथमच समरांगणी गाठ घालून लढाई दिली तरी माणूस फार खराब होईल. यास्तव आपले लोक कायम राहून त्याचा नाश होय ऐसा हुनर जाला पाहिले. आम्ही राज्य सोडविले, शहरे मारली, स्वारी शिकारी करीतो ते निराळे. हे पठाण जात हट्टी, उभे राहून आडून माणूस खराब करितील. यास्तव हुनर करून जेर करावा हा विचार चांगला".[३]

२)शाहिस्तेखानप्रसंगी शिवाजीराजे म्हणतात की, "सर्व कारकून, सरदार जमाव करून विचार केला जे, गनिम चालून आला यास कोणते उपाये व हुनरे करून जेरजूर करावा, तंबी कशी पोचवावी, आपली फौज लोक जायां न करिता कसा उपाय करावा? ते समयी सर्वांचे विचारे समतें मोंगली फौज बाहेर कटीकबाड, सामान, रसद, जवाब धरून बंदी करावी. आधीच पुढे तोंड देऊन लढाई कशास करावी?बंदी करून घाबरा पाडावा. एखादे आडसंधीस मारून काढावा किंवा एकादे किलीयास येऊन मोर्चे देऊन बसू द्यावा, येथे मारावे."[४]

३)विजापूरवर दिलेरखानाने आक्रमण केले त्यावेळी शिवाजीराजांनी विजापूरकरास मदत केली.दिलेरखानाशी लढण्यासाठी मोठी फौज उभी केली. त्यावेळी शिवाजीराजांचे धोरण कायम होते. त्यावेळी ते म्हणतात की, गनिम सामान बहुत कहें, त्याहीमध्ये पठाण जात हट्टी, यासी माणसे जायां न करीतां हुन्नरेचं करून खजीत होऊन नामोदरम होय ते करावे.[५]

स्थलकालपरत्वे शिवाजीराजांनी कूटनीतीचा स्वीकार केला होता. सैन्यात शिस्त आणण्यासाठी नियम केले होते. त्यानुसार स्त्रियांचा आदर करावा, त्यांना वेठीस धरू नये, ठार मारू नये असा दंडक होता. तो शुक्रनीतीतील विचार शिवाजीराजांनी पाळला. याची प्रचिती ज्यावेळी औरंगजेबाने उदाराम देशमुखाची पत्नी रायबागीण हिला शिवाजीराजांवर आक्रमण करण्यासाठी सेनेसह उंबरखिंडमार्गे पाठविले. त्यावेळी शिवाजीराजांनी पाच पाच हजार सेनेसह बोराटीकर रामजी पाटील, यशवंतराव देशमुख, रामाजी विश्वासराव यांना पाठवले. त्यांनी स्त्रीशी युद्ध कसे करावे अशी शंका व्यक्त केली असता शिवाजीराजांनी शुक्रनीतीतील वचनानुसार म्हटले की, बायलेक युद्धवध आहे, त्यापक्षी स्त्री शस्त्रविरहीत न मारावी. शस्त्र धारण केले असता निंद्य नाही. असे समाधान करून या सेनापतींना रवाना केले. रायबागीणीचा पराभव केला. तिच्याकडील घोडे, हत्ती, उंट, तट्टे, डेरेदांडे, वस्त्रे, भांडी, दागिने, रोकड, खजिना लुटला परंतु तिचा सन्मान करून औरंगाबादला रवाना केली.[६]

कूटयुद्धासाठी योग्य अशा काळाचे भान शिवाजीराजांना होते. त्यानुसार पारंपरिक पद्धतीने भारतीय राजनीतीज्ञांनी सांगितलेल्या अश्विन ते चैत्र अखेर या काळातच शिवाजीनेच नाही तर मराठीसत्तांचा शेवट होईपर्यंत मोहिमा काढून सैन्याच्या हालचाली होत होत्या. भाद्रपद महिना संपताच तंबूराहूटयांचीदुरुस्ती, घोडयांना नाला ठोकणे अशी कामे करीत परमुलूखावरील मोहिमेसाठी दसरा हा शुभ मुहूर्त समजला जाई.

शिवाजीराजांनी आपल्या कूटनीतीच्या यशस्वीतेसाठी शुक्रनीतीमध्ये सांगितल्याप्रमाणे रणनीती अवलंबिली. ती पुढीलप्रमाणे–

१)शिवाजीराजांनी सैन्यात गतिमानता आणली. त्यासाठी दिरंगाई केली नाही.
२) भर पावसातही मोंगल सैन्याने तळ दिल्यावर त्यास वेढा देऊन हस्तगत करण्याचा प्रयत्न केला. उदा. १६७२ मध्ये पावसात जव्हार व रामनगर या राजांच्या मुलूखावर आक्रमण केले. तर मोंगलांचे लोहगड व कोहज हे किल्ले काबीज केले. परंतु शुक्रनीतीतील 'ना नारायेत स्वसेनां तु सहसा युद्धकामुका' या वचनाप्रमाणे आपल्या सैन्याची हानी कमीत कमी होईल याकडे लक्ष दिले होते.

३)शिवकाळात एका राज्यास त्याच्या शत्रूराज्याच्या मुलखावर आक्रमण करण्यासाठी निकटच्या तटस्थ राज्याच्या मुलखातून जाणे भाग पडल्यास त्याची स्वारी करणा–या राज्याला परवानगी द्यावी असा नियम होता. शिवाजीराजे अशी परवानगी घेत असत. ब–याच वेळी तटस्थ राष्ट्रे मोंगलांच्या भीतीमुळे शिवाजीराजांना अशी परवानगी नाकारली जाई. असे प्रसंग स्वराज्याचा विस्तार करणा–या शिवाजीराजांना अडचणीचे वाटत, तरी त्या नियमांचे पालन केले जात असे.

४) शुक्रनीतीतील राष्ट्रभृत्यविशंकी स्यादीनमन्यबलो रिपुः।
युक्त्या तथा प्रकुर्वीत सुमंत्रबलयुक स्वयम्।।३।।
सेवया वा पावाणिग्वृत्या रिपुराष्ट्रं विमृश्य च।।४।।

या वचनाप्रमाणे शत्रू प्रदेशावर आक्रमण करण्यापूर्वी योग्य ती तरतूद करीत असत. सुरत शहराच्या लुटीच्या आधी कित्येक दिवस दोन तीन हजार लोक खलाशी व व्यापा–याच्या वेशात सुरतेतील धनाढय व्यापारी व त्यांच्या संपत्तीची माहिती मिळविण्यासाठी पाठविण्याचा उल्लेख आहे. स्वतः शिवाजीराजे वेश पालटून सुरत शहरात राहिल्याचा उल्लेख आहे. [७]

५) मोंगलाचे लक्षावधी सैन्य असूनही होते त्या सैन्याला न जुमानता शिवाजीराजांनी सुरत शहर लुटले. एका बाजूला मोंगलांचे सैन्य दुस–या बाजूस सैन्य होते. परंतु या दोन्ही बलाढय शत्रूंमधून शिवाजीराजे सुरतहून सुरक्षितपणे मागे परतले.[8]

या मोहिमेच्या वेळी शिवाजीराजांच्या सोबत काही दिवस राहिलेला खेंच वकील जर्मेन याने शिवाजीराजांच्या साध्या राहणीची तारीफ केली. त्यांच्यासोबत इतर लवाजमा नव्हता म्हणून वाटेल तितक्या लांब मजला त्यास अल्पावधीत करीता येत.[९]

६) शिवाजीराजांना महाराश्ट्राच्या भूगोलाचे उत्तम ज्ञान होते. महाराष्ट्राबाहेरील मोठी शहरे व गावे यांचीही माहिती होती. त्यामुळे अत्यंत वेगाने लष्करी कार्यवाही करणे सहज शक्य होत असे. त्यासाठी आपल्या गुप्तहेरांचा उपयोग कुशलतेने करीत असत.
७)शुक्रनीतीमध्ये सांगितल्याप्रमाणे लष्करी कार्यवाही यशस्वी करण्यासाठी संधी, विग्रह, यान, आसन, आश्रय आणि द्वैधीभाव या शड्गुणांपैकी यान या गुणाचा अवलंब करून यशस्वी होण्यासाठी योजना तयार करीत असत. तर अफजलखान व मिर्झाराजे यांच्या आक्रमणाच्या वेळी संधी व आश्रय यांचा वापर करून त्या प्रसंगात आपले रक्षण केले होते.
8) शिवाजीराजे कोणत्याही संकटात उडी घेण्यास कचरत नसत. लोकास हाताखाली वागवण्यास ईच्छिणा–याने स्वतः तसे वागावयास तयार असले पाहिजे हे शिवाजीराजे जाणून होते. शिवाजीराजे जे नियम घालून देत व जे हुकूम ते दुस–यांना देत असत ते स्वतः पाळण्यास कधी चुकत नसत.[१०]

९) शुक्रनीतीतील जलान्नतृणसंरोधैश्शत्रून संपीडय यत्नतः
पुरस्ताद्विशमे देशे पश्चाद्धन्यात्तु वेगवान ।।

श्लोकानुसार शत्रूला पकडून त्याजला जेरीस आणण्यात जो फायदा शिवाजीराजांना वाटे तो शत्रूला ठार मारण्यात त्यास वाटत नसे.[११]

१०) युध्दकार्यवाहीसाठी शिवाजीराजे प्रत्येक गोष्टीचे नियोजन करीत असत. शाहिस्तेखानावर लालमहालात टाकलेला छापा हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. शिवाजीराजे सिंहगड मार्गे पुण्यात येतात. त्या रस्त्यावर दहा जसवंतसिंगचे दहा हजार सैन्य होते. ते सैन्य ओलांडून पुण्यात येणे व छापा घालून परत जाणे ही काही सोपी गोष्ट नाही. त्यासाठी केलेली योजना व नियोजन अप्रतिम होते. यातील कोणताही टप्पा चुकला असता तर शिवाजीराजे पकडले जाऊ शकले असते.

११) शिवाजीराजांच्या युद्धपद्धती विषयी खफिखान म्हणतो की, आपल्या राज्यातील लोकांचा मान कायम राखण्याविशयी शिवाजीचे प्रयत्न एकसारखे चालू होते. देशात बंडाळी करावी, लमाण लूटावी, येणे करून लोकांस त्रास होईल खरा, परंतु हया पलीकडे कोणतेही कृत्य हातून घडत नसे.[१२]

यावरून शिवाजीराजे हे कूटयुद्धपद्धतीचे पक्के अनुयायी होते. बलाढय मुसलमानांशी लढण्याकरिता धर्मयुद्धपद्धती अयोग्य व कूचकामी आहे हे शिवाजीराजांना शिवपूर्व काळात भारतीय क्षत्रियांच्या झालेल्या पराभवामुळे आणि त्यांच्या झालेल्या परिणामांची जाणीव झाल्यामुळे लक्षात आले. त्यामुळेच मोगल व आदिलशहा या बलाढय व संपन्न अशा दोन मुसलमानी सत्तांच्या विरोधात लढून शिवाजीराजांनी यश मिळविले. भारतवर्शात असलेल्या पारंपरिक परिस्थितीच्या विरोधात तत्कालीन परिस्थितीस अनुसरून नवीन तत्त्वांचा, युद्धपद्धतीचा, राजनीतीचा मार्ग स्वीकारला.

शिवाजीराजांनंतर ही कूटयुद्धाचा उपयोग केला गेला.बाजीराव पहिलाने या युद्धपद्धतीचा उपयोग करून मराठी राज्य राखले. परंतु अमात्यांच्या कृतीस्वातंत्र्याच्या धोरणामुळे स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतराची प्रक्रिया सुरु झाली. कूटयुद्धपद्धतीचा त्याग करून मैदानी युद्धपद्धतीचा अवलंब केला. त्याचा त्यांच्या युद्धकुशलता आणि गतिमानता यांचेवर परिणाम झाला. मराठी सत्तेची धार निस्तेज होत गेली. मराठयांचा पराभव झाला.

*संदर्भ :–*

१) Sen S.N., Foreign Biography of Shivaji, Delhi, 1979. P.94
२) शुक्रनीती अध्याय ४ प्रकरण ७
३) स. प्र. शि., पृ.१२३, उधृत भट भा.वा., शिवाजीची राजनीती, धुळे १९४१, पृ. २७३
४) स. प्र. शि.,पृ.२१०, उधृत, उपरोक्त पृ. २७४
५) स. प्र. शि.,पृ.३५१, उधृत, उपरोक्त
६) ढेरे रा.चि. 'शिव दिग्विजय', शिवरायांची बखर, अनमोल प्रकाशन, पुणे, १९७५
७) पोर्तुगिज दप्तर, खंड३, अनुवाद, सं. श. देसाई, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,१९६8,पृ.9–१0
8) गर्गे स. मा.(संपा.)मराठी रियासत,सरदेसाई,गो.स.,खंड१,पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,१९३२पृ.३७8
9) English Record on Shivaji, भारत इतिहास संशोधन मंडळ,पुणे,पृ.२२9 –३०
१0) उपरोक्त
११)उपरोक्त शुक्रनीती अध्याय ४ प्रकरण ७
१२) गर्गे उपरोक्त पृ३४७

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net